# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 05.02.2026** **वार- गुरुवार**

---

**नाव**

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीतील मतदाराचं नाव तसंच मतदान केंद्र शोधण्याकरिता 'मताधिकार' मोबाईल ॲप उपलब्ध करून देण्यात आलं आहे; अधिकाधिक मतदारांनी या ॲपचा वापर करावा, असं आवाहन पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केलं आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांकरिता परवा ७ फेब्रुवारीला मतदान होणार आहे. या ॲपमध्ये मतदाराचं संपूर्ण नाव किंवा मतदार ओळखपत्राचा म्हणजे EPIC क्रमांक नमूद करून मतदार यादीतील नाव तसंच मतदान केंद्रही शोधता येणार आहे.

**फुले**

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना आता बाह्यरुग्ण विभागाची सेवा पुरविणाऱ्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सर्वच उपकेंद्र आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांना लागू करण्यात आली आहे. या निर्णयामुळं नागरिकांना योजनेअंतर्गत नव्यानं समाविष्ट केलेल्या सुमारे २ हजारांहून अधिक आजारांवरील उपचारांसाठी आर्थिक लाभ घेता येणार आहे. योजनेत प्रत्येक कुटुंबाला दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंत आरोग्य उपचारांचं संरक्षण दिलं जातं. राज्यातील सर्वच नागरिक या योजने अंतर्गत, राज्यातील कोणत्याही सरकारी किंवा खासगी संलग्न रुग्णालयात, योजनेच्या संकेतस्थळावर दिलेल्या रुग्णालयांमध्ये आगामी रक्कम न भरता उपचार घेऊ शकतात असं योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांनी संगितलं.

**झेडपीमुले**

पुणे मॉडेल स्कूल या उपक्रमांतर्गत पुणे जिल्हा परिषदेच्या शाळांमधील ४० विद्यार्थ्यांना लोणावळा इथल्या INS Shivaji या नौदल प्रशिक्षण केंद्रात अभ्यास दौऱ्यासाठी नेण्यात आलं. या अभ्यास दौऱ्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी भारतीय नौदलाच्या विविध तंत्रज्ञान आणि युद्ध कौशल्याचा अनुभव घेतला. हा दौरा विद्यार्थ्यांच्या मनात देशप्रेमाची भावना आणि देशासाठी योगदान देण्याची जिद्द निर्माण करणारा ठरेल हा विश्वास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी व्यक्त केला.

**एनआयवी**

पुण्यातील राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेद्वारे, संस्थेच्या ७४ व्या वर्धापन दिनानिमित्त, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये विषाणू आणि त्यापासून पसरणारे आजार याबाबत माहिती देण्यासाठी प्रयोगशाळेच्या आवारात प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं होतं. यामध्ये विद्यार्थ्यांनी शास्त्रज्ञांकडून माहिती घेतली. 'एनआयव्ही' प्रयोगशाळा भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेच्या अंतर्गत कार्यरत आहे. इथं विविध विषाणूंवर संशोधन केलं जातं. तसंच, शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना ते करत असलेल्या कामाबाबत माहिती दिली जाते आणि शास्त्रज्ञ, संशोधक बनण्यासाठीही मार्गदर्शन केलं जातं असं प्रयोगशाळेचे संचालक डॉक्टर नवीन कुमार यांनी सांगितलं.

**अतिक्रमण**

पुणे शहरात अतिक्रमण कारवाई अधिक कडक करण्यासाठी अतिक्रमण शोधण्याची जबाबदारी सर्वस्वी स्थानिक कनिष्ठ अभियंत्यावर देण्यात आली असून पुढील कारवाईसाठी विविध विभागाच्या जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत. अतिक्रमणावर कारवाई केल्याचा विस्तृत अहवाल आयुक्त कार्यालयाकडे विहीत मुदतीत पाठविण्याचे आदेश आयुक्त नवल किशोर राम यांनी दिले आहेत. पुणे ग्रँड टूर निमित्त तयार करण्यात आलेल्या रस्त्यांवर कुठल्याही पद्धतीची खोदाई करण्यात येणार नसल्याचंही महापालिका आयुक्त नवल किशोर राम आणि जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी स्पष्ट केलं आहे.

**पदपथ**

नागरिकांना सुसज्ज रस्ते आणि सुयोग्य पदपथ उपलब्ध व्हावेत यासाठी मार्गदर्शक तत्वं तयार करण्यात आली असून त्यानुसारच रस्ते आणि पदपथ यांची उभारणी करण्यात यावी असं पुणे महापालिकेतील अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत ठरविण्यात आलं. शहरातील गटारांवरील अधिकाधिक झाकणं पुढील तीन महिन्यात समपातळीत आणण्यासाठी अतिरिक्त पथकं करून गुणवत्तापूर्ण काम केलं जाणार आहे. पुणे महापालिकेच्या पथ विभागातील अधिकाऱ्यांसमवेत अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी ही आढावा बैठक घेतली.

**अनागोंदी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर संकलन विभागानं केलेल्या सर्वेक्षणाच्या अनागोंदी कारभाराविषयी आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या नेतृत्वाखाली सखोल चौकशी समिती नेमण्यात आली आहे. महापालिकेच्या कर संकलन विभागानं सर्वेक्षणात नागरिकांना नियमबाह्य आणि चुकीच्या पद्धतीनं मालमत्ता कर आकारणी, नियमबाह्य बिलं आकारल्याचा आरोप नागरिकांनी केला होता. याची दखल घेत सखोल चौकशीसाठी समिती नेमण्यात आली आहे.

**चर्चासत्र**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभाग तसंच Indo-European Education Foundation यांनी संयुक्तपणे “समकालीन जागतिक संघर्षांचं आकलन; सुरक्षितता, कूटनीती, सामाजिक न्याय आणि जागतिक शासन व्यवस्थेवरील भारत-युरोप दृष्टीकोन” या विषयावर दोन दिवसांचं आंतरराष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केलं आहे. हे चर्चासत्र ७ आणि ८ फेब्रुवारीला विद्यापीठाच्या परिसरात होणार आहे.

**जयमालामहोत्सव**

महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीनं पुण्यात येत्या १२ आणि १३ फेब्रुवारी रोजी दोन दिवसीय श्रीमती जयमाला शिलेदार जन्मशताब्दी महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. टिळक रस्त्यावरील टिळक स्मारक मंदिर इथं सायं ५ वाजल्यापासून हा महोत्सव आयोजित करण्यात आला असून त्यासाठी प्रवेश विनामूल्य आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**